# देवी प्रसाद मिश्रच्या दोन कविता

## मुसलमान

असं म्हणतात की ते आले आपदेप्रमाणे
असं म्हणतात ते फैलावले प्रदूषणासारखे
ते रोगराई होते.
ब्राह्मण म्हणत, ते म्लेंछ होते
ते मुसलमान होते.

आपले घोडे त्यांनी सिंधूत उतरविले–
आणि ओरडायला लागले–हिंदू! हिंदू!! हिंदू!!!
मोठ्या समुदायाला त्यांनी मोठे नाव दिले
नदीचे नाव.

प्रत्येक खोल आणि विस्तीर्ण नदी
पार कराविशी वाटतसे त्यांना
ते मुसलमान होते पण तेदेखील
–कबीरच्या शहाणपणाला दाद देणार असू आपण तर–
हिंदूंप्रमाणेच जन्माला येत.

त्यांच्यापाशी मोठ्या कहाण्या होत्या
चालायच्या
थांबायच्या
युद्धाच्या
आणि मृत्यूच्या
गुडघ्यापर्यंत शत्रूच्या
आणि खांद्यापर्यंत स्वत:च्या रक्तात
माखले असायचे ते
त्यांच्या मुठीत असायचे घोड्यांचे लगाम
आणि म्यानामधे संस्कृतीचे नकाशे.

छे! मृत्युसाठी नाही!
मृत्युसाठी नाही खेळायचे ते युद्ध
ते मुसलमान होते.

ते इराणातून आले
तातार देशातून आले
समरकन्द, फ़रग़ना, सीस्तानहून आले
तुर्कस्थानातून आले

खूप लांबून आले ते
तथापि पृथ्वीच्याच काही भागातून आले
ते आले, कारण येणं शक्य होतं त्यांना
ते मुसलमान होते.

ते मुसलमान होते, की.. देवा रे!
त्यांचे चेहरे तर अगदी माणसांसारखे होते!
अगदी हुबेहुब !

ते देशोधडीला लागलेले
त्यांच्याजवळ होत्या
दुःखभरल्या स्मृति

घोड्यांबरोबर झोपायचे ते
आणि कड्यावर वीर्य सांडायचे
निर्माण करण्यासाठी बेचैन
ते मुसलमान होते.

सत्य जर सत्य म्हणून सांगता येत असेल
तर सत्य हे सत्याप्रमाणे ऐकायलादेखील हवंच

साधारणतः ते असे दिसायचे की
बहुतेक वेळा लक्षातदेखील नाही यायचं
की ते मुसलमान आहेत किंवा नाही आहेत
ते मुसलमान होते.

# कविता

अनुवाद : **शरद नावरे**

ते नसते तर लखनौ नसतं
अर्ध इलाहाबाद नसतं
कमानी नसत्या, घुमट नसते
शिष्टाचार नसते

मीर मक़्दूम मोमिन नसते
शबाना नसती

ते नसते तर भरतखंडाचं संगीत ऐकणारा ख़ुसरो नसता
ते नसते तर आख्ख्या देशातील संतापानेअस्वस्थ होणारा
कबीर नसता
ते नसते तर भारतीय उपमहाद्वीपाचं दु:ख उगाळणारा
ग़ालिब नसता

मुसलमान नसते तर अठराशे सत्तावन नसते झाले

ते होते म्हणून चाचा हसन होते
ते होते म्हणून पतंगांनी रंगून जाणारे आकाशहोते
ते मुसलमान होते.
ते मुसलमान होते आणि हिन्दुस्तानात  होते
त्यांचे नातेवाईक पाकिस्तानात होते

त्यांच्या मनात यायचे की आपल्याला एकदाच
पाकिस्तानात जाता आलं तर
त्यांच्या मनात यायचे आणि भीती वाटायची

इम्रान खानला पाहून ते खुश व्हायचे
खुश व्हायचे आणि खुश झाल्यावर त्यांना भीती
वाटायची

जेवढे घाबरायचे ते पी. ए. सी.च्या शिपायाला
तेवढेच रामला
ते मुरादाबादला घाबरायचे
ते मेरठला घाबरायचे
ते भागलपुरला घाबरायचे
ते आव आणायचे पण घाबरायचे

पवित्र रंगांना घाबरायचे ते
आपल्या मुसलमान असलेपणाला ते घाबरायचे

ते परागंदा नव्हते पण घर म्हणून आपल्या घरात
देश म्हणून आपल्या देशात
स्वत:त,  स्थिर नव्हते

ते अलिप्त राग-द्वेष होते
ते मुसलमान होते.

ते कापड विणायचे
कपडे शिवायचे
कुलूपं बनवायचे
पेट्या बनवायचे
त्यांच्या कष्टांचे आवाज
आख्ख्या शहरात भरून जात

शहराच्या बाहेर त्यांची वस्ती असे

ते मुसलमान होते खरे, पण दमास्कस त्यांचे शहर नव्हते
ते मुसलमान होते खरे, पण अरबांचं पेट्रोल त्यांचे नव्हते
ते दजलाचं नव्हे, यमुनेचं पाणी प्यायचे
ते मुसलमान होते.

ते मुसलमान होते, म्हणून नजर चुकवून सटकत
ते मुसलमान होते, म्हणून काही बोलायला कचरत
देशातील बरीचशी वर्तमानपत्रे म्हणायची
की मुसलमानांमुळे कर्फ़्यू लागतात
कर्फ़्यू लागत आणि बातम्या येत एका पाठोपाठ दुसऱ्या
दुर्घटनेच्या

त्यांच्या स्त्रिया न ओरडता कोलांट्या खात
मुलं भिंतीला चिकटून राहत
ते मुसलमान होते.

ते मुसलमान होते म्हणून
गंजल्या कुलुपाप्रमाणे ते नसत उघडे होत

पाच वेळा ते नमाज पढ़ायचे खरे
पण त्या पेक्षा कितीतरी पटीने जास्त वेळा
डोकं बडवून घेत
ते मुसलमान होते.
त्यांना विचारायचं असे, या लाल किल्ल्याचं आम्ही
काय करावं
त्यांना विचारायचं असे, या हुमायूनच्या मकबऱ्याचं
आम्ही काय करावं
आम्ही काय करावं या मशिदीचं जिचं नाव
कुव्वत-उल-इस्लाम,- इस्लामची शक्ती - आहे

आल्याप्रमाणे ते कडवट होते
ते मुसलमान होते.

त्यांना वाटायचं, की निघून जाऊ या कुठे तरी
तर जाणं शक्य नव्हतं
त्यांना वाटायचं की इथेच थांबूयात
तर थांबणं शक्य नव्हतं
अर्धमेल्या बकऱ्याप्रमाणे त्यांना जाणवायचे झटके त्रासाचे

ते मुसलमान होते, म्हणून
वादळात सापडल्या जहाजातील प्रवाशांप्रमाणे
एकमेकाला धरून असत

काही लोक चर्चा करायचे
त्यांना फेकायचे ते कुठल्या समुद्रात
चर्चा अशीही असायची
की त्यांना लोटून द्यायचे ते कुठल्या कड्यावरून

ते मुसलमान होते, पण किडामुंगी नव्हते
ते मुसलमान होते, ते कोंबड्यांची पिलं नव्हते

सावधान!
सिंधुच्या दक्षिणेला
शेकडो वर्षांच्या नागरिकतेनंतर
मातीची ढेंकळे नव्हते ते
कड्याप्रमाणे, लोकरीप्रमाणे ते खरेखुरे होते
सिंधु आणि हिन्दुकुशप्रमाणे ते खरेखुरे होते
सत्य ज्या कोणत्याही म्हणून प्रकारे जाणवते
त्या त्या प्रकारे सत्य होते ते
संस्कृतीचा ते अटळ नियम होते
ते मुसलमान होते, किंवदंती नव्हते

ते मुसलमान होते.
ते मुसलमान होते.
ते मुसलमान होते.

कविता

## चांगला मनुष्य बनवणारी औषधे

खोकल्याचं औषध विकत घेतल्यावर मी केमिस्टला म्हणालो की
चांगला मनुष्य होण्यासाठी एखादं औषध आहे काय त्यावर गालातल्या गालात हसत तो म्हणाला की
एका लेटेस्ट स्कीममधे कण्डोमबरोबर इच्छा फ्री आहेत. मी म्हणालो की
कवी स्वत:च इच्छा आणि स्वप्नांचं संस्मरण असतो. तो कुजबुजत म्हणाला की जो सिनेमा शेजारच्या
थिएटरात लागलाय त्यात झाडाला पाणी घालायचं कोणतंच दृश्य नाहीय.
आणि रात्रीच्या शो नंतर घरी जाणारं पब्लिक म्हणत होतं की मारणे ही पण एक कला आहे
मी घाबरून म्हणालो की मी भाच्याबरोबर बोलण्यासाठी म्हणून मी फोन केला तर तो देवाला लागलेला दिसतो.